**उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विद्यापीठांचा उल्लेख “राज्य सार्वजनिक विद्यापीठे” असा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: साविअ-२०२५/ई-१४४८३०१/विशि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई : ४०००३२.
दिनांक : १५ एप्रिल, २०२६.

## शासन परिपत्रक

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पारंपरिक विद्यापीठांना अकृषि विद्यापीठे असे संबोधले जाते. तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषि व पदुम विभाग यांच्यासहीत वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली देखील विद्यापीठे कार्यरत आहेत. ही बाब विचारात घेता अकृषि विद्यापीठे असा शब्दप्रयोग करणे उचित नाही.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, दिनांक १ मार्च २०१७ पासून लागू झाला असून या विभागाच्या अखत्यारितील ११ विद्यापीठे त्या अंतर्गत कार्यरत आहेत. सदर ११ विद्यापीठांची यादी सोबतच्या **प्रपत्र-अ** येथे जोडली आहे. ही सर्व विद्यापीठे या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्य सार्वजनिक विद्यापीठे असून त्यांच्या बाबत यापुढे अकृषि विद्यापीठे असे संबोधण्यात येऊ नये. त्याऐवजी “राज्य सार्वजनिक विद्यापीठे” असे संबोधण्यात यावे.

३. वरील सार्वजनिक विद्यापीठांव्यतिरिक्त उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विशिष्ट उद्देशाकरिता निर्माण केलेली किंवा स्वतंत्र अधिनियमानुसार कार्यरत असणारी इतर सार्वजनिक विद्यापीठे देखील अस्तित्वात आहेत. त्याबाबतचा तपशील सोबतच्या **प्रपत्र- ब** येथे जोडला आहे.

४. वरील परिपत्रक संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला यांनी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे आणि यापुढे सर्व पत्र व्यवहारांमध्ये अकृषि विद्यापीठे असा शब्दप्रयोग टाळावा. जेणेकरून “ राज्य सार्वजनिक विद्यापीठे” असा योग्य शब्दप्रयोग प्रचलित होईल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०४१५१६१७४४२१०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.04.15 16:19:52 +05'30'

**(प्रताप पां.लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,लोकभवन,मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री(नगरविकास) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री(राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाज़गी सचिव, मंत्रालय, मुंबई .
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाज़गी सचिव, मंत्रालय, मुंबई .
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
१०. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई
११. संचालक, कला संचालनालय, मुंबई
१२. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण.
१३. कुलसचिव,सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे ,महाराष्ट्र राज्य.
१४. कुलसचिव,सर्व समूह विद्यापीठे ,महाराष्ट्र राज्य.
१५. कुलसचिव,सर्व अभिमत विद्यापीठे ,महाराष्ट्र राज्य.
१६. कुलसचिव,सर्व महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठे ,महाराष्ट्र राज्य.
१७. कुलसचिव, सर्व तंत्रज्ञान विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
१८. कुलसचिव, यशवतंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१९. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
२०. कुलसचिव, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, अमरावती
२१. कुलसचिव, लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर
२२. कुलसचिव, सर ज.जी.कला, वास्तुकला, अभिकल्प विद्यालय, मुंबई.
२३. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण.
२४. निवडनस्ती (विशी-४)

(शासन परिपत्रक क्र. साविअ-२०२५/ई-१४४८३०१/विशि-४, दिनांक  १५ एप्रिल, २०२६ सोबतचे सहपत्र)

## <u>प्रपत्र-अ</u>

### महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंतर्गत येणारी विद्यापीठे

१. मुंबई विद्यापीठ, मुंबई
२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
४. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
६. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
७. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
८. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
९. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१०. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठ, जळगाव
११. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी  महिला विद्यापीठ, मुंबई

(शासन परिपत्रक क्र. साविअ-२०२५/ ई-१४४८३०१/विशि-४, दिनांक १५ एप्रिल, २०२६ सोबतचे सहपत्र)

## प्रपत्र-ब

## इतर विद्यापीठे

अ) स्वतंत्र अधिनियम असणारी विद्यापीठे-

१. यशवतंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
२. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, जि. नागपूर
३. मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जि. अमरावती
४. लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर

ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंतर्गत स्थापन झालेली समूह विद्यापीठे-

१. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई
२. हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजीएट विद्यापीठ, मुंबई
३. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा
४. वारणा विद्यापीठ, वारणानगर, जि. कोल्हापूर

क) अभिमत विद्यापीठे (अनुदानित)

१. डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था, पुणे
२. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
३. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था, पुणे

ड) विधी विद्यापीठे-

१. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई
२. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
३. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर

इ) तंत्रज्ञान विद्यापीठे-

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड.
२. कॉलेज ऑफ इंजिनियरींग पुणे विद्यापीठ, पुणे
३. इन्स्टिटट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई.

ई) डिनोव्हा विद्यापीठ-

सर ज.जी.कला, वास्तुकला, अभिकल्प विद्यालय, मुंबई.